# शिदोरी

सुरेश पंदारे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

## सुरेश देवराम पंदारे

लिखित

कथासंग्रह

# शिदोरी

# शिदोरी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

शिदोरी (कथासंग्रह)

सुरेश देवराम पंदारे

पत्ता : लक्ष्मीगंगा रेसिडेन्सी, सिंहगड रोड, पुणे ५१

मोबाईल नं : ९३७२१९९१००

मेल आय डी - pandaresuresh@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १२ जुलै २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

सुरेश देवराम पंदारे



| | | |
|---|---|---|
| पत्ता | : | लक्ष्मीगंगा रेसिडेन्सी, सिंहगड रोड, पुणे ५१ |
| मोबाईल नं | : | ९३७२१९९१०० |
| हुद्दा | : | सेवानिवृत्त, चिफ मॅनेजर, बँक ऑफ बडोदा |
| आवड | : | अध्यात्म, वाचन,  लेखन, सामाजिक कार्य |

ज्ञानेश्वरीवर प्रवचने तसेच एकनाथी भागवत, हरीपाठ आणि नामदेवमहाराजकृत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीवरील अभंगाचे निरूपण

## कथानुक्रम

सोन्याचे डूल

जीजी

दैव जाणीले कुणी

कळा ज्या लागल्या जीवा

मुलांच्या मेहनतीचे फ़ळ

# सोन्याचे डूल

आज ३० वर्षे झाली त्या गोष्टीला पण अजूनही त्याची नुसती आठवण आली तरी मन अस्वस्थ होते. बँकेच्या कामानिमित्त नेहमीच बेलीफबरोबर कोर्टात आणि नंतर दरखास्तची अंमलबजावणी करण्याचे प्रसंग श्रीरामपूरला असताना सतत यायचे. नेहमी सहकारी अधिकारी मित्र श्री. हरकल सोबत असायचे. किती प्रसंग किती घटना. कर्तव्यापुढे नतमस्तक होताना हृदय मात्र पिळून निघायचे.

एकदा तर कुटुंबातील बाईने उंबराच अडवला होता. जप्तीचा आदेश घेऊन घराबाहेर थांबलो होतो. हट्टाला पेटलेलो होतो आम्ही. मग काय ती थोड्या वेळापुरती घरात गेली आणि आम्ही बेलिफासह घराच्या पहिल्या खोलीत शिरलो. घरातल्या ज्या काही किमती वस्तू होत्या त्याचा पंचनामा करून जप्ती बजावली. मन मात्र खूप दु:खी झालं होतं.

पुढच्या एका जप्तीला वकिलांनी सांगितले म्हणून जमीनदारावरच अटक वॉरंटचा हुकूम घेतला. सकाळी ७ वाजता त्या गावात गेलो होतो. ज्याच्या नावे वॉरंट होते तो अनवाणीच सकाळी देऊळात भजनाला चालला होता. बेलिफाने पोलीस पाटलाच्या साक्षीने ते बजावले आणि आम्ही त्याला जीपमध्ये घेऊन अहमदनगर येथील कोर्टात हजर सुद्धा झालो. गंमत म्हणजे त्याची २ दिवसांची राहण्याची सर्व व्यवस्था आम्हीच केली. दुसऱ्या दिवशी कोर्टाने त्याच्याकडून हमीपत्र-प्रतिज्ञापत्र लिहून त्याला सोडलेही. त्याही दिवशी आम्हीच त्याला पुन्हा नगरवरून त्याच्या श्रीरामपूरजवळच्या गावी सोडले. हा कसला सरकारी कारभार होता काही कळत नव्हते.

आज मात्र गोंधवणी या गावी तीन केसेस होत्या. पहिल्याच घरी गेलो. सकाळचे कोवळे ऊन त्या झोपडीवजा घरात पडल्यामुळे घरातील वस्तू स्पष्ट दिसत होत्या. पाटील हाक मारली हरकलने. तर नुकताच आवरून तयार झालेला तो साठीचा हणमंता पुढे आला. त्याच्या बायकोला त्याने चहा ठेवायला सांगितला. बेलिफ आणि हरकलने नकार दिला पण मला होकार देण्यावाचूनच गत्यंतर नव्हते.

चहा घेऊन त्याची बायको बाहेर आली. गिरजा तिचे नाव. जुनेच पण स्वच्छ धुतलेली नववारी साडी हातातल्या काचेच्या रंगीबेरंगी बांगड्या. आणि कपाळावर भलंटिपोरं कुंकू. एवढ्यात माझं लक्ष तिच्या साध्या मंगळसूत्राकडे गेलं कानात दोन नक्षीदार डुल म्हणजे कर्णफुले. खूपच उठून दिसत होती. चहात दूध खूपच कमी होते हे तिने आवर्जून सांगितले. ‘‘शेळीने आज एकच ग्लास दूध दिले बघा. पाहुणे आल्यावर कसं काय करावं?’’

‘‘ठीक आहे. ” मी म्हटले. “किती पैसे भरावे लागतील आता?’’

बेलिफ आणि श्री. हरकलने नोटिशीतील रक्कम सांगितली.

‘‘अहो एवढे पैसे कुठे जमतात व्हय. दमादमाने भरू की. ’’

मी ठीक आहे म्हटल्यावर हणमंताला धीर आला.

त्याने हात जोडून एक विनवणी केली. ‘‘तुम्ही एक-दीड तास थांबून या की तजबीज करतो म्हटलं. ’’

‘‘ठीक आहे. आम्ही २ तासांनी येतो. ’’

आम्ही तिघेही दुसऱ्या वस्तीवर जायला जिपने निघालो. तिथे शेतावरच्या पिकाची नोंद घेऊन कोर्टात तशी पुरशीस द्यायची होती. म्हणजे

येणाऱ्या पिकाच्या उत्पन्नातून काहीतरी वसुली होऊ शकते असे वकीलाचे म्हणणे होते. शेत जरा दूर होते. वस्ती आल्यावर आम्ही तिघेही खाली उतरलो.

थोडे चाललो आणि पाटलाचे घर आले होते. यापूर्वी आम्ही एकदा माहिती घेण्यासाठी आलो होतो त्यामुळे श्री. भाऊसाहेब सोनवणेंनी ''या या'' म्हटले.

''आधी शेतीवर जाऊ ,'' श्री. हरकल माझ्या सहकारी अधिकाऱ्याने भाऊसाहेबांना सांगितले.

''दोन वर्षे काहीच पीक आले नाही. '' या वर्षी थोडा भुईमूग आणि हरबरा येईल. तीन-तीन पोती जरी झाला तरी दोन-तीन हजार भरता येईल. भाऊसाहेब चालता चालता माहिती देत होता.

''ठीक आहे. स्वत: येऊन बँकेत पैसे भरले तरी चालेल" मी त्याला सांगितले.

तसा कागद लिहून घेतला आणि आम्ही निघालो. अजून एक वॉरंट होते पण त्या वस्तीवर कोणीच नव्हते. मजुरीसाठी घरातले सगळेच दुसऱ्याच्या शेतावर गेले होते. यायला पाच-सहा तरी वाजतील. शेजारच्या म्हाताऱ्याने माहिती दिली.

परत फिरण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. हणमंतरावाकडे जायचे होते.

घरी आलो तर गिरजा बाहेरच उभी होती.

नवऱ्याचीच वाट पाहत होती. आम्हाला घरात या म्हटली. आम्ही तिघेही त्या लाकडाच्या बाजेवर बसलो. बाजेवर गोधडी टाकली होती आता.

गिरजा थोडी खिन्न होती. सकाळचा प्रसन्न चेहरा उदास वाटत होता. कानातल्या डुलाकडे माझे लक्ष गेले पण कानात काहीच नव्हते.

धापा टाकीत घाम पुसत हणमंता सायकल वरून उतरला.

''म्हटला हे घ्या. पुरे १५०० रुपये आहेत. करा जमा. ''

मला राहावले नाही म्हटले एवढ्या घाईत कुठे गेला होता.

''सायकलवर श्रीरामपूरला. ''

हणमंता आणि गिरजा दोघांनी आम्हा तिघांना हात जोडले.

मी त्याला म्हटले, ''अरे नंतर आम्ही पुन्हा आलो असतो. पुढची तारीख घेतली असती. ''

"पण आलेल्या सावकाराला रिकाम्या हाताने कसे पाठवायचे. बायकोनेच मला श्रीरामपूरला पाठविले. "

आम्ही काय समजायचे ते समजलो.

गिरजाचा एकच दागिना होता. कानातले डुल तेही विकून त्याने पैसे दिले होते.

त्याची कृतज्ञता आणि सरकारी कामाची कृतघ्नता कसे मोजमाप करायचे असा विचार करून आम्ही त्या उदार जोडप्याचा निरोप घेतला. माझे अंत:करण जड झाले होते. जीपमध्ये बसलो तरी शरीर गरगर फिरते की काय असे वाटत होते.

पुन्हा माझ्यावर असा प्रसंग नियतीने आणू नये अशा विचारात आम्ही बँकेकडे शाखेत निघालो.. .

# जीजी

परवा उत्सवानिमित्त गावी गेलो होतो. माझ्या गावी रंगदास स्वामींचा दरवर्षी उत्सव भरतो. पंचक्रोशीत तो प्रसिद्ध तर आहेच; पण हजारो भाविक उत्सवाला येऊन जातात. आमटी-भाकरीचा प्रसाद आता नुसता वर्तमानपत्रात येत नाही तर आता मराठी टीव्ही चॅनेलवरही तो दाखविला जातो. माझ्या घरासमोरच सोनारांचे घर आहे. गावी गेलो म्हणजे पाच-सहा घरी हमखास जातोच. लहानपणाचे दिवस आठवतात. सध्या काय चाललेय याचा पण कानोसा घेतो. आरती झाली. आमटीचा प्रसाद मित्रांबरोबर घेतला आणि मी घरी परतलो.

समोर शांताराम उभा होता. त्याने हाक मारली. त्याच्या ओट्यावर बसलो. त्याला म्हटले आई गेल्याचे आताच कळाले. तिला सगळे जिजी म्हणत होते. आजारी नव्हती पण आयुष्यभर कामच केल्याने आणि वय पण ७० च्या पुढे गेल्याने ती पूर्ण थकली होती. अशक्त झाली होती. पुण्याचे उपचार पण केले म्हटला. परंतु काही उपयोग झाला नाही. जिजीच्या आठवणीने बोलता बोलता माझे डोळे पण पाणावले.

मी अगदी लहान होतो. चौथी-पाचवीत असेल. शांतारामचे वडील म्हणजे राजारामशेठ सोनाराच्या व्यवसायाबरोबर बटाटे-भुईमुग याचा ठोक व्यवसाय करीत होते. भुईमुगाची पोत्यांची घरात थप्पी लावली जायची. जिजीने त्या शेंगांचे शेंगदाणे करायचे काम असे. ते करायला आम्हा मुलांना छोट्या मुलींना ती बोलावत असे.

तिच्याकडे जुने शेराचे, पायलीचे माप असे. दिवसभर एक शेर शेंगदाणे करून झाले की ती आम्हाला रोख पैसे द्यायची. आठ आणे शेर. अहो १९६३-६४ साठी दोन दिवसांची सुटीची कमाई १  रुपया व्हायची. किती आनंद व्हायचा तिला. जिजीने हातात आठ आण्याचे नाणे ठेवल्यावर. असा आनंद आज एटीएममधून १०,०००/- रुपये काढल्यावरही होत नाही. जिजी आमच्या मुलांची खूप काळजी घ्यायची. एकादा घरी गेला नाही तर जेवायला सुद्धा द्यायची. पाच-सहा वाजता कामं संपताना आम्हाला काहीतरी खायला हमखास देणार. जिजीने दोन पेपरमिंटच्या पांढऱ्या गोळ्या जरी दिल्या तरी सगळ्या मुलांचा चेहरा खुलायचा.

शांतारामने घरात बोलावले. त्याचा मुलगा आता व्यवसाय सांभाळतो म्हटला. सूनबाई नाशिकची आहे ती पण त्याला मदत करते आता. बोलता बोलता आम्ही मधल्या घरात आलो. आता तिथे सोफा ठेवलाय. मला पूर्वीचे दिवस आठवले. जिजी डोळ्यासमोर उभी राहिली.

“सुरेश तू चांगला हुशार आहेस. वाचन चांगले आहे. पण एक काम करशील का?”

म्हटले, “हो ना जिजी. ”

“परवा श्रावण सुरू होणार आहे. ब्राह्मणाच्या ऐवजी तूच पोथी वाचशील का?”

म्हटले, “हो. ”

एकादशी माहात्म्य झाले. श्रावणात मी एकादशी माहात्म्य चालू केले. जिजीने आमच्याच गल्लीतल्या सगळया बायकांना यायला सांगितले. घर भरले होते. मी पोथी वाचली पूर्ण श्रावणात.

जिजीने माझ्या भक्तीची मुहूर्तमेढ रोवली. पायाभरणी केली. पुढच्या वर्षी तिने हरिविजय वाचायला सांगितला. मला चांगले आठवते. मी सातवीत होतो. मधून मधून थांबून मी अर्थ सांगायचो. आधीच श्रीधरस्वामींची रसाळ वाणी, सोपी भाषा आणि त्यात मी थांबून विस्तारून कथा सांगायचो. जिजीला खूप छान वाटायचे. तिचा चेहरा अगदी प्रफुल्लित व्हायचा. हरिविजय वाचायला घेतल्याचे सार्थक झाले असे ती सगळया बायकांना सांगू लागली.

जिजीने असे ४-५ वर्षे माझ्याकडून ग्रंथ वाचून घेतले. मलाही गोडी वाटू लागली. पुढे मी कॉलेजला पुण्यात गेलो. आणि मग पोथी वाचणे थांबलेच. जिजी सुटीत वाचतोस का म्हणायची? पण ते जमले नाही.

जिजी म्हणजे एक वेगळेच रसायन होते.

गल्लीत काय, गावात काय कोणाकडे सत्यनारायण असले तरी चौरंग न्यायला जिजीकडेच यायचे. जिजीने कोणाला नाही म्हटल्याचे मला आठवत नाही. मागच्या वाड्यात २-३ गायी असत. जर ताक जास्त झाले तर आम्हांला मुलांना ती घरून भांडे आणून म्हणायची. तांब्या भरून ताक द्यायची जिजी. शेंगांचा हिशोबाचा चार आठ आण्याचा हिशोब करणारी व्यवहारी जिजी इथे मात्र बेहिशोबी असायची.

तिच्याकडे कोणी मध मागायला यायचे कधी कोणी सहाण मागायला. औषधासाठी काही पाहिजे म्हटले आणि तिच्याकडे असले तर तिने कधी नाही म्हटलेच नाही.

तिच्या शांताराम बरोबर कुसुम बरोबर बेबी बरोबर आम्ही सगळे घरभर खेळत होतो. वर त्यावेळी माडी होती. आता नवीन बांधकाम तिथे खोल्या काढल्यात. माडीवर खेळताना आवाज झाला तर जिन्यावरून ओरडत येणारी जिजीच होती. तिचे ओरडणे रागावणेपण आम्हाला बरे वाटायचे.

माझ्या आईपेक्षा चुलती बरोबर ती चांगली गप्पा मारायची. रात्री सात-आठ वाजता तिच्या अंगणात आम्ही सगळेच खेळायचो. चांदण्यात खेळताना प्रकाशाची कमतरता वाटतच नव्हती. गावात लाईट खूप उशिरा आली. घरच्यांनी हाका मारेपर्यंत आम्ही तिच्या अंगणात खेळत असायचो. ती बऱ्याच वेळा पायरीवर बसून खेळ बघायची. मधून मधून प्यायला पाणी आणायची.

जिजीच्या आठवणीने मी पूर्ण हरवून गेलो होतो. दुपारचे चार वाजले होते. शांताराम व त्यांच्या घरच्यांचा निरोप घेतला. त्याने पुण्यात एक फ्लॅट घेतला होता. रतन टॉकिजजवळ. त्याचा पत्ता त्याने दिला. माझाही पत्ता त्याने घेतला. आणि निरोप घेतला.

बालपणीच्या आठवणीने जिजीने खूप जागा व्यापली होती. आता फक्त औपचारिकताच उरली आहे. प्रेम, आपुलकी माया हे जिजीच्या बरोबरच विलीन झालेत.

मी पुण्याच्या परतीच्या प्रवासाला लागलो होतो. आता जिजी पुन्हा भेटणार नाही हे शल्य मनात राहिले होते.

# कळा ज्या लागल्या जीवा!

आज मंगल नेहमीसारखी आनंदी नव्हती. दोन घरची धुणीभांडी करून आली होती. नेहमीप्रमाणे दारातूनच काकू आवाज देणारी आज लगोलग कामाला लागली. काकूने तिला विचारलेही पण ती गप्पच. तिने आज चहाही नको म्हटले. काय झाले होते तिला? खोदून खोदून विचारले तेव्हा ती थोडे बोलली. आज तिच्या सहा वर्षांच्या मुलाला ताप आला होता. तरीही ती कामावर आली होती. पहिल्या घरी कामावर यायला थोडा उशीर झाला होता खरा.

“काय गं आज पण उशीर?” नाडकर्णी काकूंनी जोरातच विचारले.

“अहो छोट्या निषादला रात्री ताप होता. आज सकाळी निघताना पण तो झोपूनच होता. येऊशीच वाटत नव्हते पण काय करू? त्याचे बाबा आठ दिवसांपासून ट्रकवर गेलेत. ते घरी असते तरी बरे झाले असते!”

“तुझ्या या नेहमीच्या सबबी आहेत, बरं का?”

“नाही हो खरंच सांगते काकू. ”

“जाऊदे! तुम्ही कामवाल्या सगळया सारख्याच!”

कसंबसं काम उरकून ती दुसऱ्या घरी गेली. काकांनी तिची नेहमीप्रमाणे विचारपूस केली.

“अगं एवढा ताप आहे तर आधी त्याला डॉक्टरकडे दाखवून यायचं-” जाधव काका तिला म्हणाले.

“जाईल अजून दोन कामे झाली का मग?”

“अगं दवाखाना दुपारी बंद होईल ना?”

“काका दवाखाना बंद होण्याच्या आत जाईल. राव डॉक्टर तसे कमी फी घेतात. गुणपण येतो त्यांचा. ”

“मी तुला एक गोळी आणि सिरप देऊका?”

“अहो ती जाईल म्हणते ना डॉक्टरकडे-” जाधवकाकू मध्येच अडवून काकांना म्हणाली.

आता हे तिसरं घर होते. नाडकर्णी काकू पेपर वाचता वाचताच तिला सूचना करीतच होत्या. “काल तू ओटा चांगला पुसला नव्हता बरं का?”

“हो काकू आज चांगला पुसून जाईल.” मंगल खोटे अवसान आणून म्हणाली.

घाईघाईने तिने सगळी सफाई केली. फरशी पुसली आणि शेवटच्या कामाकडे लगबगीने गेली.

‘आज मी जरा लवकर जाईन. जर काम राहिलेच थोडे तर उद्या सगळे करीन बरं का?” ती कुलकर्णी मॅडमला म्हणाली.

मॅडम डॉक्टर होत्या. आणि तिच्या क्लिनिकला पण मंगलच फरशी पुसण्याचे काम करते. घरच्या खालीच दवाखाना असल्याने दोन्ही कामे तिच करीत

असते. मॅडमला तीन वर्षांची मुलगी होती. डॉक्टरांचीच मुलगी ती. स्वरा तशी गोड स्वभावाची पण आज थोडी नरम होती. आईस्क्रीमने खोकला येत होता की काल बाहेर जेवायला गेल्याने व्हायरल इन्फेक्शन झाल्याने हेच तिच्या आईला डॉक्टर असूनही कळत नव्हते.

दवाखाना मंगलनेच उघडला. त्यानंतर डॉक्टर मॅडम आल्या.

पेशंट बाहेर वाटच पाहात होते.

पहिल्याच पेशंटला तपासले. तर घरून फोन आला-

“अगं स्वरा जरा कुरकुर करते.. ”

“तिला एक चमचा सिरप द्या ना मग. ”

स्वराच्या आजीला सूनबाईंनी फोनवरच सांगितले.

दुसरा पेशंट आत यायच्या तयारीतच होता. तेवढ्यात डॉक्टर मॅडम म्हटल्या,

“पाच मिनिटं थांबता का? मी जरा मुलीची तब्येत बघून येते. ”

पेशंटने होकार दिला.

मंगल अजूनही दवाखान्यातच सफाई करीत होती. मनातल्या मनात विचारचक्र चालूच होते. मलाही निषादच्या तब्येतीची काळजी आहे हो. पण घरी जायला कधी मिळेल असे झालेय.

थोड्या वेळाने काम झाल्यावर झपाझप पावले टाकत ती घरी निघाली.

घर कसले? पत्र्याची एक मोठी खोली. त्यातच तिचा संसार थाटला होता. ड्रायव्हर नवरा तिच्या दोन मुली आणि छोटा निषाद त्या खोलीत राहत होते.

दुसरीकडे भाडे परवडत नव्हते म्हणून ह्या पत्र्याच्या खोलीत तिचे बिर्हाड बारा-तेरा वर्षांपासून राहात होते. भाडे १५०० रु वीज बिलापोटी १०० रु. तिला द्यावे लागत असत.

दहा-पंधरा मिनिटांतच नेहमीचा रस्ता पण आज तिला तो लांब वाटत होता.

ऊन डोक्यावर आले होते. पांढऱ्या रुमालाने तिने डोके झाकले होते. तरीही येतच होता.

तिचे माहेर मराठवाड्यात. परभणी जवळच्या खेड्यात. सासर जवळच होते. नात्यातच लग्न झाले. तिची शाळापण झाली नाही नीट. तेरा-चौदा वर्षांचींच होती ती. घरच्यांनी लग्नाचा सोहळा उरकला. अठरा-एकोणीस वर्षांचा नवरा होता. आत्याचाच मुलगा असल्याने नाही म्हणायचा प्रश्नच नव्हता. दहा वर्षांपूर्वीचे दिवस तिच्या डोळयासमोर उभे राहिले.

नवऱ्याला त्यावेळी ३००० हजार रुपये महिना पगार होता. खेड्यातून पुण्यात यायचे या आनंदातच ती होती. ट्रकवरची नोकरी म्हणजे आठ-आठ दिवस घरी येणे नाही बाकी नवरा चांगला होता. दारू पित नव्हता ही त्याची जमेची बाजू. ती अगदी अभिमानाने सांगायची.

यावेळी जाताना त्याने वेगळेच डोक्यात घेतले होते जुना टेम्पो घेऊ.

"अहो पण त्याला रक्कम कुठे आहे?"

“अग आपण नाही का बँकेत मुलीच्या नावाने तुझी आठ वर्षांची कमाई ठेवली. पावती केली ना तू. ”

“नाही बरं का? तिच्या लग्नाला त्याचे एक लाख रुपये मिळणार. मी ती मोडणार नाही. ”

पण मंगलचा हा हट्ट काही कामाला आला नाही. टेम्पो आला की आपण स्वतंत्र. कोणाची नोकरी नको. दहा-पंधरा हजार तर सहजच मिळतील.

मंगलला वाटले पगारापेक्षा चांगले होईल. तिला चार घरच्या भांड्याधुण्याचे चार-पाच हजार मिळत होते. शाळा-पुस्तके-फी हे सगळे तीच पाहत होती. मध्यंतरी मुलींची शाळा बदलावी असेही वाटले. तिच्या दुसऱ्या मुलीची प्रांजलीची खेळात खूप प्रगती होती. खोखो, कबड्डीचा खेळ पाहून शिक्षकाने तिला दुसऱ्या शाळेचा पत्ताही दिला. परंतु येणारा खर्च परवडणारा नाही म्हणून त्यावेळी तिने तो नाद सोडून दिला.

टेम्पो घेतला तर प्रांजलला दुसऱ्या शाळेत घालता येईल असे तिला वाटले.

डोक्यात विचारचक्र चालूच-

तिची खोली जवळ आली होती. तिने बाहेरूनच निषादला हाक मारली.

“निषादऽ ए निषादऽऽ चल आपल्याला डॉक्टरकडे जायचं आहे. ”

“अग पण आई ऊन खूप आहे ना. आता संध्याकाळी जाऊया. ”

“अरे पण तुझा ताप उतरला नाही तर मग.. .. ” कसेबसे निषादला तयार केले तिने.

पुन्हा उन्हात आणि तेही चालत चालत ती डॉक्टरकडे निघाली. निषादला वाटले आईला सांगावे कडेवर घे म्हणून.

पण सहा वर्षांचा तिचा निषादही आता समंजस झाला होता. घरी आजीकडे चांगली शेतीवाडी असूनही आईबाबा इकडे आपल्याच करिता कष्ट करतात हे त्याला समजत होते. दोघही मायलेकरे धापा टाकीत दवाखान्याकडे चालले होते. निषादला मोठे करायचे ना मग हा त्रास सहन नको का करायला.

''चल भरभर दवाखाना बंद होईल बरं. ''

''नाही आई अजून अर्धा तास आहे बंद व्हायला. ''

''तुला कसे रे माहीत?''

''तुझ्या मोबाईलमध्ये पाहिले मी १ वाजलेत. ''

''दवाखाना दीड वाजता बंद होतो आई. ''

निषादचा थोडासा तापही तिला अस्वस्थ करत होता.

कडक उन्हातही ती तापलेल्या निषादला घेऊन दवाखान्यात निघाली होती.

# दैव जाणिले कुणी?

सकाळचे सात वाजले असतील. शेजारच्या शहा भाभींनी बेल वाजवली.

सौ. शोभाने दार उघडले. शहा भाभी पूर्ण घाबरलेल्या होत्या.

‘काय झाले?’ मी अर्धवट झोपेतच विचारले.

त्या आत आल्या. आमच्या फोनवरून अहमदाबादला अर्जंट फोन करायचा आहे म्हणाल्या.

‘ठीक आहे’ मी म्हटले.

त्यांनी फोन बुक केला व थांबल्या. त्यांचा फोन कदाचित बंद असावा.

थोड्याच वेळात फोनची रिंग वाजली. भाभींनी फोन घेतला. त्यांच्या भावाला त्या सांगत असाव्यात असे मला संवादावरून जाणवले.

दिनेशची तब्येत सिरीअस झाली आहे. ताबडतोब निघून ये. येताना दिनेशच्या घरी  पण कळव व ताबडतोब या सांग मालेगावला. या पुढे काहीच बोलल्या नाहीत त्या.

काही न बोलताच घरी गेल्या.

त्यांच्या मागे मी आणि सौ. पण गेलो. घर समोरच होते. फक्त ५ फुटांचे अंतर.

त्यांच्या घरी बरीच गर्दी  जमली होती.

त्यांचे नेहमीचे फॅमिली डॉक्टर तपासत होते दिनेशला.

त्यांनी डॉक्टर गुजराथींना बोलावून आणण्यास निरोप दिला.

भाभी त्यांच्या पतिसमोर पायापाशी बसल्या होत्या. दिनेश काहीच प्रतिसाद देत नव्हता.

त्यांच्या फॅमिली डॉक्टरने हळूच भाभींना बोलावले. बाजूला घेऊन सांगू लागले.

त्यांचे बोलणे खूप हळू आवाजात होते. मी अहमदाबादला फोन करून आले. भाभींनी सांगितले.

अजूनही कोणी नातेवाईक असतील त्यांना पण बोलावून घ्या. मी डॉक्टर गुजराथी येईपर्यंत थांबतो. म्हटले,

भाभी सारख्या रडत होत्या. त्यांना धीर देत भावसार वहिनी म्हटल्या,

“शांत बसा दिनेश भावोजी सोबत. आम्ही पाहतो. शहा कुटुंबाला एक मुलगी एक मुलगा होता. मुलगी १३/१४ वर्षांची व मुलगा मोठा होता पण अजून वय तसे लहान होते. अभ्यासात जेमतेम प्रगती होती. व त्याचीच आईवडिलांना काळजी होती.

तेवढ्यात डॉ. गुजराथीं आलेले दिसले. त्यांच्यासोबत त्यांचा कंपाऊंडरपण होता. माझी थोडीशी ओळख होती. त्यांच्या दवाखान्यात मी पूर्वी १-२ वेळा गेलो होतो. त्यामुळे साहीद ह्या त्यांच्या कंपाऊंडरला मी दुरूनच स्मित हास्य केले. दोन्ही

डॉक्टर बीपी चेक करीत होते. आमचे सर्वांचे लक्ष त्यांच्या ट्रीटमेंटकडे लागले होते. इसीजी चेक करत होते. नाडी हातात घेऊन तपासत होते.

डॉ. गुजराथींनी दिनेशची नाडी लागत नाही असे भाभींना म्हटल्यावर घरात एकच कल्लोळ झाला. आतापर्यंत हुंदका भरणाऱ्या भाभी आता जोरजोरात रडत होत्या.

'ह्या दोन मुलांचा सांभाळ मी कसा करू? सांगा ना.. .. .. '

डॉक्टर उठले. आम्ही सगळे डॉक्टरांच्या भोवती जमा झालो. आता काही आशा नाही. असाच त्यांच्या बोलण्यातला सूर होता. काहींनी दिनेशला नाशिकला हालवण्याचा सल्ला दिला परंतु भाभींचा दोन्ही डॉक्टरवर विश्वास होता. त्यामुळे आता सर्वांना बोलवायचे ठरले.

मालेगावमधील बरीच  शहा कुटुंबाचे ओळखीचे आणि नातेवाईक घरी येऊ लागले होते.

साजिद मात्र दिनेशच्या जवळ जोरजोरात छातीवर दाब देऊन श्वासोच्छवास चालू होतो का ते पहात होता.

जमलेले सगळे गप्पा मारत होते. प्रसंग गंभीर होता. त्या गंभीरतेचे भान त्यांच्या कुटुंबियांना सोडून कोणालाच असू नये याचे मला नवल वाटले.

सौ. शोभाने डॉक्टरांसाठी घरून कॉफी करून आणली. दोन्ही डॉक्टर व काही नातेवाईकांना ती दिली.

२ तास झाले होते. आता पुढची तयारी करावी असे लोक म्हणू लागले. अहमदाबादचे नातेवाईक संध्याकाळपर्यंत येतील असा निरोप भाभींनी स्थानिक जवळच्या संबंधितांना दिला. खालचे भावसार काका दिनेश शेजारी बसले होते. बहुतेक ते ॐ नम: शिवाय चा जप करत असावेत.

एवढ्यात साजीदचा आवाज आला. दिनेशने श्वास घेतल्याचे त्याला जाणवले व मग त्या आनंदात तो चांगला दाब देऊ लागला. दिनेशचा श्वासोच्छवास चालू झाला होता. डॉ. गुजराथींनी  नाडी तपासली. नाडी थोडा प्रतिसाद देत होती. त्यांनी बी पी पुन्हा चेक केला. तो खूपच कमी झाला होता. त्यांनी एक गोळी पाण्यातून बळेच दिली. नंतर एक इंजेक्शन दिले.

साजिद मात्र पूर्ण ताकदिनीशी प्रयत्न करतच होता. त्याच्या प्रयत्नाला यश येत होतं. ओ अल्ला तेरा लाख लाख शुक्रीया.. त्याने दोन्ही हात जुळवून एकदा अल्लाला जणू साद घातली होती.

दिनेश बोलत नव्हता पण पूर्ण शुद्धीत आला होता. हात पाय हलवत होता. हाताने त्याने खूण केली.

पाणी द्या असे तो म्हणतोय असे वाटले म्हणून भाभीने घाईघाईने पेलाभर पाणी ओतले.

दोन घोट पाणी दिनेशने घेतले. त्याच्या चेहऱ्यावरून भाभीने कुरवाळले. दिनेश, मला सोडून तू कसा चालला होतास रे? भाभीच्या चेहर्‍यावर आनंदाचे भाव आले होते.

अजून काही वेळाने तो शुद्धीवर येईल मग त्याला गोळया ठेवल्या त्या द्या असे डॉक्टर म्हटले.

दोन्ही डॉक्टर आता सगळयांचा निरोप घेऊन बाहेर पडले. सोबत मसिहा म्हणून आलेला साजिद पण होता. जणू काही विशेष मी केले नाही असा भाव त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. परंतु दिनेशला मृत्यूच्या दारातून आणणारा व त्याला पुनर्जन्म देणारा देवदूत तोच होता. आम्ही सगळे भाभींचा निरोप घेऊन चाललो.

एक-दोन दिवसांनी दिनेश त्याच्या पेंटच्या दुकानात जाऊ लागला. भाभी त्याची खूप काळजी घेऊ लागल्या. त्यांच्या मुलाची सागरची त्यांना काळजी होती. बाकी दिनेश सोडून तिघेही नेहमी दांडियात भाग घेत. त्यामुळे सगळया गुजराथी कुटुंबात शहांचे हे कुटुंब चांगलेच प्रसिद्ध होते.

आता १०-१२ दिवस गेले असतील. बँकेतून मी बाहेर पडलो. दिनेशच्या शेजारीच विप्रोच्या एजन्सीचे दुकान होते. मी कामानिमित्त विनोदकडे बसलो. का कोण जाणे आज मला दिनेशची भेट घ्यावी असे वाटले. त्याचे दुकान शेजारीच होते.

दुकान बंद व्हायला थोडा वेळ होता. मी दिनेशच्या दुकानाची पायरी चढलो. आणि दिनेशच्या शेजारीच लाकडी बाकावर बसलो.

आता कशी तब्येत आहे?

नंतर काही त्रास झाला का?

असे औपचारिक बोलून मी दिनेशला बोलते केले.

सागरची काळजी तुम्ही सोडा. त्याला जे आवडते ते करू द्या. हट्ट करू नका असे म्हटले.

दिनेशने त्याला शेअर बाजारात शिरकाव करायची इच्छा आहे. त्याचे मामा याच्यातच आहेत. ते त्याला मुंबईला ये म्हणतात असे दिनेश सांगू लागला.

मी ही इथे त्याला ओळखीच्या दलालाबरोबर ट्रेडिंगचा अनुभव घेऊद्या असे सुचविले.

दिनेशला ह्याचीच काळजी होती. त्या विचारातच तो असे हे मलाही समजले.

त्या दिवशी तुमचा पुनर्जन्मच झाला की म्हटले. त्यानंतर खूप गंभीरतेने आणि शांत स्वरात दिनेश सांगत होता. मी लक्ष देऊन एकाग्र होऊन ऐकत होतो.

त्या दिवशी मी माझा मृत्यू पाहिला. आणि नवीन जीवन मिळाले तेही अनुभवले.

मी आता राहणार नाही हे  जाणवले. मी नि:शब्द होतो. तुमच्या सगळयांचा आवाज मी ऐकत होतो. माझे डोळे बंद होते. परंतु ट्रिटमेंट मी पाहत होतो. घरचे रडत होते. पण मला बोलता येईना. साजिदमुळे मी श्वास घेऊ लागलो होतो हे ही मला समजले.

मी सुद्धा दिनेशचे ऐकून मंत्रमुग्ध झालो होतो  त्यावेळी मला काहीच समजले नाही.

पण आज २५ वर्षांनी की त्याचा अर्थ लावू पाहतो एका पाश्चात्त्य डॉक्टर ऊी. थळश्रश्रळरा ङशुळी ची पुनर्जन्मावरची पुस्तके मी वाचली होती. छशरी ऊशरींह एुशीीळशपलश वर त्यांनी खूप भाष्य केले आहे.

तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यावर अनेक संतांची चरित्रे व अधिकारी महात्म्यांचे विवेचन मी वाचले आहे. त्यामुळे दिनेश हा मृत्यूच्या दारातून परत आलाय व त्याचा हा जणू पुनर्जन्मच झाला आहे याची मला खात्री पटली.

देहातून प्राण सोडताना हा जीव त्याच्या जीवनयात्रेचे संपूर्ण दृश्य एखाद्या चलत चित्रपटाप्रमाणे पाहत असतो. आयुष्याचा ७०-८० वर्षांचा काळ तो अगदी काही क्षणात अंतःचक्षूंपुढे आठवतो. झालेल्या चुका/अपराध याची स्पष्ट जाणीव त्या शुद्ध जीवात्म्याला होत असते असे आपले शास्त्र सांगते. दिनेशचे पुनरागमन हा त्याचा एक ट्रेलर होता.

डॉक्टरांनी हात टेकले असताना साजिद सारख्या कंपांऊडरने प्राण परत आणले होते. माणसामाणसाने निर्माण केलेले हे भेद जात/धर्म या किती कच्च्या

दुव्यांवर उभे आहेत याची जाणीव साजिदच्या स्वरूपात झाली होती पण हे कोण लक्षात घेते?

# मुलांच्या मेहनतीचे अखेर फळ मिळाले

ही गोष्ट आहे १९९५ ची. प्रसाद त्यावेळी १० वीत होता. आम्ही मालेगावला होतो. त्याचा १० वी च्या बोर्डाचा रिझल्ट आणायला आम्ही शाळेत गेलो होतो. दुपारी ३ च्या सुमारास मार्कशीट मिळणार होती. मार्कशीट मिळाली पण ते पाहून प्रसाद एकदमच कोसळला. ओकसाबोकशी रडू लागला. मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक आमच्या चांगल्या परिचयाचे होते. त्यांनी मला प्रसादच्या आईला व प्रसादला एका ठिकाणी बसविले. व शांत केले.

हे शक्य नाही पप्पा. प्रसाद जोरात ओरडला. त्याला संस्कृतला ३९ मार्कस होते. आणि त्यामुळे त्याची टक्केवारी ७० च्या आत आली होती. आम्ही सर्वच नाराज झालो होतो. मुख्याध्यापक श्री. मालपाठक व प्रसादचे वर्गशिक्षक यांनी व संस्कृतचे शिक्षक यांनी आमची व प्रसादची समजूत काढली. त्याला संस्कृतमध्ये प्रत्येक परिक्षेत ९५-१०० गुण मिळत होते. त्यामुळे संस्कृत या भाषा विषयात इतके कमी गुण अशक्य आहे असे सर्व शिक्षकांचे मत झाले. फेरतपासणीचा अर्ज भरून शाळेतर्फे नाशिक बोर्डाकडे पाठवू असे मुख्याध्यापकांनी सांगितले. तसा अर्ज भरून प्रसादची सही घेतली. आम्ही काकाणी शाळेतून बाहेर पडलो.

तो दिवस आमचा व प्रसादचा उदासीनतेचा गेला. सर्व विद्यार्थी आनंद व्यक्त करीत होते. शाळेच्या अंगणात पेढे वाटून आपला आनंदोत्सव साजरा करीत होते. परंतु आम्ही त्या मन:स्थितीतच नव्हतो.

प्रसादचा अगदी बालवाडीपासून ते दहावीपर्यंतचा काळ माझ्या डोळ्यासमोर आला. येवल्यात त्याच्या बालवाडीच्या शिक्षिका त्याचे खूप कौतुक करायच्या. येवल्यावरून बदली झाली ती कोपरगाव तालुक्यातील वारी गावी. तिथे एकच वर्षे राहिलो पण प्रसाद व माधवी शाळेत नेहमीच अव्वल. माधवी तर पूर्ण ६ वर्षांचीही नव्हती. परंतु स्वत: मुख्याध्यापकाने घरी येऊन आमचे प्रतिज्ञापत्र लिहून कोपरगावला जाऊन ते नोंदवून आणले आणि तिला रीतसर प्रवेश दिला. ती त्यावेळी फक्त ५॥ वर्षांची होती.

सौ. शोभाने प्रसाद माधवी योगेश यांना शाळेत सोडणे व आणणे हे स्वत:कडेच घेतले होते. अगदी बडोद्यात असताना सुद्धा ती तिघांच्याही शाळेच्या वेळा सांभाळत होती. मुलांचा १० वी पर्यंत तरी आईवडिलांचा सहवास प्रेम मिळावे ही तिची माफक अपेक्षा. म्हणूनच प्रसादचा नवोदयला टाकळी (ता. पारनेर, जि. नगर) येथे नंबर लागूनही आम्ही त्याला न पाठविण्याचा निर्णय घेतला होता. प्रसादच्या जन्माच्या वेळी मला जळगावला एक पुस्तक दिसले.

“घरोघर ज्ञानेश्वर जन्मती” डॉ. ह. वि. सरदेसाईंचे हे पुस्तक तिने नुसतेच वाचले नाही तर त्याप्रमाणे परीक्षेतील काळात मुलांची आहाराची तिने काळजी घेतली होती. तीनही मुलांचे मित्र माधवीच्या शाळेतील - कॉलेजामधील मैत्रिणी आमच्या घरी नेहमी येत. सर्वांचीच ती आदारतिथ्य करीत असे.

मी एक वर्षे हायस्कूलमध्ये नोकरी केली. १० वी ११ वीचे सायन्स व गणित विषय शिकवले. १९७१/७२ साली त्यामुळे प्रसाद माधवी आणि योगेश यांचा अभ्यास घेताना किंवा शंका निसरन करताना १० वी पर्यंत तरी अडचण आली नाही.

प्रसादच्या वर्गशिक्षकाने त्याला मिडलस्कूल परीक्षेस बसविण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी सुद्धा सौ. शोभाने त्याचे क्लासचे वेळापत्रक पूर्ण सांभाळले होते. तो स्कॉलरशीप मध्ये गुणवत्ता यादीत आला आणि तिच्या व प्रसादच्या परिश्रमाचे साफल्य झाले. वेळोवेळी होणाऱ्या शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमात, वक्तृत्व स्पर्धेत खेळात मुले भाग घेत. माधवीने बडोद्याला कथ्थक नृत्याचा क्लास लावला होता. योगेशला श्रीरामपूरला तबला शिकावासा वाटला तोही वयाच्या ६ वी वर्षीच. एक वर्षे त्याने पण तबल्याचा क्लास केला.

हे सगळे मी आठवीत होतो. प्रसादला हा बसलेला धक्का सहन करण्याविषयी काय करता येईल म्हणून धीर देत होतो. त्याने बडोद्याला असताना ५ वी / ६ वीतच गाण्याच्या स्पर्धेत भाग घेतला. एम. सी. हायस्कूलच्या छोट्या दालनात ती स्पर्धा झाली. आम्ही सगळेच गेलो होतो. त्याने ‘जहॉं डाल डाल पर सोने की चिडिया करती है बसेरा’ हे देशभक्तीपर गीत म्हटले होते. त्याच्या गटातील पहिले बक्षीस त्याने पटकावले होते.

मुलांवर संस्कार करायचे, मुलांना घडवायचे म्हणजे यापेक्षा वेगळे काय करायचे असते. त्यांचे छंद जोपासायचे.. त्यांच्या आवडीनिवडी सांभाळायच्या.

प्रसादला सहलीची फिरायची आवड म्हणून आम्ही नुकतीच दक्षिण भारताची सहल करून आलो होतो. बडोद्याला असताना आमच्या जवळच अरविंद यांचा आश्रम होता. प्रसाद तिथे जाऊन त्यांची पुस्तके वाचायचा. देशभक्तांची पुस्तके, साने गुरुजी, महात्मा गांधी आणि नेहरू यांची पुस्तके त्याने अनेकवेळा आणली. सुट्टीत पुस्तक वाचण्याचा त्याला छंदच होता. एकदा तर त्याने गोरखपूर प्रेसच्या पुस्तकांची यादीच मला दिली. त्यातील २०-२५ पुस्तके मी पोस्टाने मागविली. तीनही मुलांनी ती सर्व वाचली.

मग आज असा हा प्रसंग का यावा हेच समजत नव्हते. त्यावर उत्तर आज तरी नव्हते

१५-२० दिवस भर्रकन निघून गेले. मार्कांची फेरतपासणीचे पत्र शाळेत आले होते. मुख्याध्यापकाने मला निरोप पाठवला. आम्ही सगळेच शाळेत गेलो. प्रसादला फेरतपासणी मध्ये संस्कृत मध्ये ९३ गुण आले होते. तो नाशिक बोर्डाच्या गुणवत्ता यादीत आला होता. शाळेने १/२ दिवसांत त्याचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. काकाणी शाळेत विश्वस्त त्याला हजर होते. मीही प्रसंगानुरूप बोललो. पण प्रसाद आनंदात होता. त्याने उत्स्फूर्त भाषण केले. पैशापेक्षा समाज आणि देश हे मोठे आहेत हा त्याच्या भाषणाचा मतितार्थ होता. माझ्यापेक्षा त्याच्या आईला, बहीण माधवीला व लहान योगेशला खूप आनंद झाला होता. त्यांच्य चेहऱ्यावर तो स्पष्ट जाणवत होता. प्रसादच्या जिद्दीचे मेहनतीचे फळ त्याला मिळाले होते.

माधवी आता ठाण्याला सिव्हिल हॉस्पिटलला इएनटी विभागात आहे. यापूर्वी तिने शहापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात मेडिकल ऑफिसर म्हणून काम केले होते. आदिवासी भागात राहून समाजसेवेची संधी तिला मिळाली होती. पक्षीय राजकारणाचा त्रासही तिने सहन केला आहे.

आज प्रसाद व त्याची पत्नी सौ. शामला त्यांच्या दोन मुलींवर आर्या व कृष्णा अमेरिकेत असूनही भारतीय संस्कार जोपासतात. हे पाहून मन आनंदित होते. प्रसादला एमएस करायला अमेरिकेत जाण्याची खूप इच्छा होती.

परंतु आम्हांला पैशामुळे ते शक्य झाले नाही. त्याने योगेशला अमेरिकेत एमएस करायला बोलावले व त्याची इच्छा प्रसादने अशी पुरी केली.

माधवीने जिद्दीने MBBS पुरे केले. आणि सोलापूरला DORL ला डिप्लोमाला प्रवेश घेतला. तिला MS करायचेच होते. नोकरीनंतर व दोन

मुलांनंतर तिने ENT मध्ये MS केले. तिचे सर्जन होण्याचे स्वप्न तिने असे जिद्दीने पूर्ण केले. parenting चा एक महिन्याचा कोर्सही तिने व जावई निखिलने पूर्ण केला. त्यामुळेच मानव आणि निरव या तिच्या दोन्ही मुलांवर संस्कार करताना ते दोघे खूप काळजी घेतात.

तिने मला एक पुस्तक वाचायला दिले होते. your child is your parent हे डॉ. मनोज लेखी (औरंगाबाद) चे पुस्तक खूपच शास्त्रीय माहितीवर आधारित आहे की ते प्रसादला व शामलला अमेरिकेत जाताना मुद्दाम घेऊन गेलो होतो. योगेशने फोटोग्राफी व संगिताची आवड जोपासली आहे. तो ही व त्याची होणारी जीवनसाथी रश्मीसुद्धा संस्काराचा हा वसा जपतील अशी आईवडील म्हणून आम्हाला खात्री आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.